# १२. संतवाणी

- **ऐका. वाचा. म्हणा.**

**कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ।।१।।**
**लसूण मिरची कोथिंबीरी । अवघा झाला माझा हरी ।।२।।**
**मोट नाडा विहीर दोरी । अवघी व्यापिली पंढरी ।।३।।**
**सावता म्हणे केला मळा । विठ्ठल पायीं गोंविला गळा ।।४।।**

**–संत सावता.**

**संत सावता** – मराठी संत कवी. त्यांचे अभंग आशयाने समृद्‌ध आहेत. आपल्या प्रपंचातील नित्य कामांना त्यांनी परमार्थाचे साधन बनवले. आपल्या शेतात-मळ्यात राबताना ते विठ्ठलाचे भजन, नामस्मरण करत.

कांदा, मुळा, भाजी, लसूण, मिरची, कोथिंबिरी यांतच माझे दैवत आहे. माझ्या शेतातले मोट, नाडा, विहीर, दोरी यांमध्येच माझे पंढरपूर व्यापले आहे, असे प्रस्तुत अभंगातून संत सावता सांगतात.

**केळी आणि तया नारेळी पोफळी । कोण घाली मुळी दुध तया ।।१।।**
**बीज तैसे फळ येत असे गोड । जाणती निवाड संत याचा ।।२।।**
**फणस आणि आंबा सिंताफळे नाना । मुळीचिया चिन्हा गोड होती ।।३।।**
**बहेणि म्हणे बीज गोड त्याचे फळ । उत्तम केवळ सेव्य सर्वा ।।४।।**

**–संत बहिणाबाई.**

**संत बहिणाबाई** – मराठी संत कवयित्री. संत बहिणाबाई या संत तुकाराममहाराज यांच्या शिष्या होत.

केळी, नारळ, पोफळी यांच्या मुळाशी कोणीही दूध घालत नाही. फणस, आंबा, सिताफळे ही फळे मुळातच गोड असतात, कारण त्यांचे बीज गोड असते. चांगले कार्य केले, तर फळही चांगलेच मिळते, हे विविध दाखले देऊन प्रस्तुत अभंगाद्‌वारे संत बहिणाबाई सांगतात.

## सुविचार

- **प्रगती हे जीवनाचे ध्येय असले तरी गती हा त्याचा आत्मा आहे.**
- **सत्य, सदाचार, अहिंसा, शांती, भूतदया ही जीवनाची मूल्ये आहेत.**
- **भविष्य पाहाणाऱ्यापेक्षा, जो भविष्य घडवतो त्याचं जीवन कृतार्थ होतं.**

- पाठ्यपुस्तकातील पाठ क्र. २ व ३ मधील नवीन शब्द व त्यांचे अर्थ खालील चौकटींत दिले आहेत. ते वाचा. याचप्रमाणे इतर पाठांतील नव्याने परिचित झालेल्या शब्दांचा अर्थ समजून घेऊन तुमचा शब्दसंग्रह तयार करा.

**पाठ क्र. २**

**कोडकौतुक करणे –** लाड पुरवणे.
**वैविध्यपूर्ण –** विविध प्रकारचे.
**नकार देणे –** नाही म्हणणे.
**विसंबून राहणे –** इतरांवर अवलंबून राहणे.
**पारितोषिक –** बक्षीस.
**निरंतर –** नियमित.
**सज्ज होणे –** तयार होणे.
**पारंपरिक –** जुन्या पद्धती, परंपरेप्रमाणे.
**कवेत घेणे –** मिठीत घेणे.

**पाठ क्र. ३**

**अगणित –** असंख्य.
**इवले –** लहान, छोटे.
**पागोळ्या –** छपरावरून खाली पडणाऱ्या पावसाच्या पाण्याच्या धारा.
**तृण –** गवत.
**पुष्प –** फूल.
**पखरण –** सडा.
**वर्षा –** पाऊस.
**सोहळा –** उत्सव, सण.
**धरणी –** जमीन.

- वरीलप्रमाणे तुम्ही तुमचा शब्दसंग्रह तयार केला आहे. शब्दकोश कसा पाहावा, हे आपण खाली दिलेल्या उदाहरणांतून पाहूया.

**'अ' गट**

पेढा, पौष, पतंग, पूर्ण, पैसा, पंकज, पुस्तक, पान, पोट, पीठ, पिचकारी

**'ब' गट**

पतंग, पान, पिचकारी, पीठ, पुस्तक, पूर्ण, पेढा, पैसा, पोट, पौष, पंकज

वर दिलेले 'अ' गटातील व 'ब' गटातील शब्द वाचा. 'अ' गटातील शब्द बाराखडीतील स्वरचिन्हांनुसार दिलेले नाहीत. 'ब' गटातील शब्द हे बाराखडीतील स्वरचिन्हांनुसार दिलेले आहेत.

पाठ्यपुस्तकातील पाठ क्र. २ आणि ३ मधील शब्द वरील भागात दिलेले आहेत. ते खालील चौकटीत शब्दकोशाप्रमाणे दिले आहेत. ते अभ्यासा.

(१) **अगणित –** असंख्य.
(२) **इवले –** लहान, छोटे.
(३) **कवेत घेणे –** मिठीत घेणे.
(४) **कोडकौतुक करणे –** लाड पुरवणे.
(५) **तृण –** गवत.
(६) **धरणी –** जमीन.
(७) **नकार देणे –** नाही म्हणणे.
(८) **निरंतर –** नियमित.
(९) **पखरण –** सडा.
(१०) **पागोळ्या –** छपरावरून खाली पडणाऱ्या पावसाच्या पाण्याच्या धारा.
(११) **पारितोषिक –** बक्षीस.
(१२) **पारंपरिक –** जुन्या पद्धती, परंपरेप्रमाणे.
(१३) **पुष्प –** फूल.
(१४) **वर्षा –** पाऊस.
(१५) **विसंबून राहणे –** इतरांवर अवलंबून राहणे.
(१६) **वैविध्यपूर्ण –** विविध प्रकारचे.
(१७) **सज्ज होणे –** तयार होणे.
(१८) **सोहळा –** उत्सव, सण.